सामना उत्सव
रविवार पुरवणी

# साधकत्व



४ जुलै हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या पुण्यतिथीचा. रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद या सुप्रसिद्ध गुरू-शिष्य जोडीच्या आयुष्यातला एक प्रसंग

मानवाचं वैशिष्ट्य म्हणजे मन. आध्यात्मिक साधनेमुळे मानवाचं मन जेवढ्या प्रमाणात उच्च संस्कारित होतं, तेवढ्या प्रमाणात त्याचं चित्त वासनारहित होतं आणि देहभावनेचा अहंकार लयाला जाऊन आत्मभावनेचं स्फुल्लिंग जागृत होतं. 'आध्यात्मिक साधना करणारा तो साधक', अशी सुटसुटीत व्याख्या रूढार्थानं वापरात असली तरी मनाच्या प्रगल्भतेनुसार मानवाचं वर्गीकरण चार प्रकारात हिंदुस्थानी अध्यात्मानं केलं आहे ते म्हणजे बद्ध, मुमुक्षू, साधक आणि सिद्ध होय. याचं सविस्तर वर्णन समर्थांनी श्रीमद् दासबोधात पाचव्या दशकात केलं आहे, जे जिज्ञासूंनी मुळातून वाचावं.

बद्धावस्थेतला मनुष्य सर्वस्वी देह सुखामध्ये बंधित असतो. आहार, निद्रादि देह सुखं आणि या सुखांच्या प्राप्तीसाठी त्यानेच निर्माण केलेल्या संसारबंधनांपलीकडे कोणताही विचार तो करत नाही. त्याचा प्रत्येक आचार आणि विचार 'देहसुख' या एकाच केंद्रबिंदूभोवती फिरत असतो. या जन्मातून त्या जन्मात असे कित्येक जन्म गेले तरी बद्धावस्थेतल्या मनुष्याला ईश्वराच्या शोधासाठी काही प्रयत्न करावेत असं वाटत नाही. बद्धावस्थेतून किंचित प्रगती झालेला मनुष्य मुमुक्षू अवस्थेत पोहोचतो. या अवस्थेमध्ये त्याची बुद्धी थोडी विचारक्षम होते आणि चित्तावरचे वासनांचे लेप काही

प्रमाणात कमी होतात. आपल्या जीवनाचे नेमके उद्दिष्ट काय याची जिज्ञासा जागृत झाल्यामुळे तो मनुष्य ज्ञान मिळवण्यासाठी उद्युक्त होतो. अर्थात ज्ञान मिळवण्यासाठी धडपड जरी त्याने केली तरी या ज्ञानाचं योग्य पृथक्करण करण्याचं सामर्थ्य त्याच्यात नसतं. त्यामुळे ज्ञानाबरोबरच त्याच्या मनात विकल्प आणि विक्षेपही निर्माण होतात. एखादा दिवस नामस्मरणासारख्या साधनेत सहभागी झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याचं मन त्याला सांगतं, 'अरे अशाने कुठं काही होत असतं का? तू उगाच वेळ फुकट कशाला घालवतोस?' या उलटसुलट विचारांमुळे त्याचं मन संभ्रमित होतं. अनेक लोक या मुमुक्षू अवस्थेत बराच काळ अडकतात. त्यांची निष्ठा कोणत्याही एका ठिकाणी केंद्रित होत नाही. कदाचित ते देहाने जप, तप, पूजा, अर्चा यासारख्या साधना करण्याचा प्रयत्न करतीलही, पण मनात सतत उपस्थित होत राहणाऱ्या शंकांमुळे ती साधना सर्वार्थाने फलद्रूप होत नाही.

तिसरी अवस्था म्हणजे साधक अवस्था. कित्येक लोक थोडी फार आध्यात्मिक साधना सुरू केली की स्वत:ला स्वयंघोषित साधक म्हणायला लागतात! परंतु वस्तुस्थिती मात्र निराळी असते कारण साधक अवस्थेतलं सगळ्यात महत्त्वाचं लक्षण असलेल्या निरपेक्ष, निर्व्याज आणि निष्काम अशा भक्तीचा त्यांच्याकडे संपूर्ण अभाव असतो. जो मनुष्य खऱ्या अर्थाने साधक अवस्थेत असतो त्याला सतत ज्ञानाची आस आणि भक्तीची ओढ लागलेली असते. स्वत:चा उद्धार कसा करता येईल हा एकच ध्यास त्याने घेतलेला असतो आणि त्यासाठी आड येणाऱ्या सर्व गोष्टींचा त्याग करण्याची त्याची तयारी असते. यामध्ये व्यावहारिक यश, धन, कीर्ती इत्यादी भौतिक सुखांचाही समावेश होतो.

यापुढील अवस्थेला अध्यात्मात सिद्धावस्था म्हणतात. मानव देहात असणारे सिद्धपुरुष ईश्वराशी संपूर्णत: तद्रूप झाले असल्याकारणाने देवत्वाला पोहोचलेले असतात. सिद्धावस्था ही सामान्य बुद्धीच्या आकलनापलीकडची असल्याने सिद्धपुरुषांचे व्यवहार, त्यांचे उपदेश सामान्य मनुष्याला काही वेळा विचित्र वाटू शकतात. जो मनुष्य संसारात अडकलेला असतो तो 'दुसरासुद्धा

त्याच्यासारखाच लवकरात लवकर कसा अडकेल', याचाच विचार करतो. याच्या सर्वस्वी उलट विचार सिद्धपुरुष करत असतात. 'काय केलं असता माझा भक्त या कर्मनियम आणि निसर्गनियमांच्या बंधनातून लवकरात लवकर सुटेल आणि त्याची मोक्षाकडे वाटचाल सुरू होईल' हाच विचार ते प्रत्येक भक्ताच्या बाबतीत करतात. मोक्षाच्या वाटचालीत जर भक्ताच्या काही भौतिक इच्छा आड येत असतील तर त्यांची पूर्तता सिद्धपुरुषांकडून केली जाते, परंतु तीसुद्धा त्या भक्ताची सुखांमधली लिप्तता वाढणार नाही याची काळजी घेऊनच!

याबाबतीत रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद या सुप्रसिद्ध गुरू-शिष्य जोडीच्या आयुष्यातला एक प्रसंग उधृत करण्यासारखा आहे. त्या काळात साधकावस्थेत असणाऱ्या नरेंद्राची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. त्यामुळे त्याने रामकृष्णांच्या मागे भुणभुण लावली की, 'तुम्ही कालीमातेकडे माझ्या कुटुंबाच्या भरभराटीसाठी साकडं घाला!' रामकृष्णांनी नाइलाजाने तशी परवानगी दिली आणि सांगितलं की, 'तूच जाऊन तिच्यापुढे काय मागायचं ते माग!' सद्गुरू आज्ञेनुसार नरेंद्र कालीमातेसमोर उभा राहिला खरा, पण काय मागायचं हेच विसरून गेला! अर्थात हे विस्मरणसुद्धा रामकृष्णांच्या कृपेनेच घडलं होतं! शेवटी शिष्याची अवस्था बघून रामकृष्णांनी नरेंद्रला आशीर्वाद दिला, 'जा, यापुढे तुझ्या कुटुंबाच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण होतील!' त्या दिवसापासून नरेंद्रच्या घरची परिस्थिती थोडी फार सुधारली. परंतु या प्रसंगानंतर खरी क्रांती साधक नरेंद्रच्या आध्यात्मिक जीवनात घडली आणि परिणामस्वरूप स्वामी विवेकानंद या सिद्ध योगीपुरुषाची प्राप्ती हिंदुस्थानी अध्यात्माला झाली!

आत्मशोधन करून नाम, मंत्र, जप, तप, यज्ञादी साधना करण्याला एक वेगळंच परिमाण प्राप्त होईल कारण त्या साधनेला एक निश्चित दिशा प्राप्त झालेली असेल.

- बापट गुरुजी